महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - ५९ ■ शनिवार दि. ०६ सप्टेंबर २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

WWW.DAILYAWAZ.COM

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!

एक महिना - २४९९/- रु.

तीन महिने - ५९९९/- रु.

सहा महिने - ९९९९/- रु.

✻ संपादक ✻

मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४


# गिरणा धरणाचे तीन दरवाजे उघडले, नदीपात्राला महापुराचे स्वरुप, पर्यटकांची गर्दी, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे प्रतिनिधी:- नांदगाव तालुक्यातील गिरणा धरणाचे तीन वक्रद्वार उघडण्यात आल्याने गिरणा नदीपात्राला महापुराचे स्वरूप प्राप्त झाले आहेत. गिरणा नदीकाठच्या गावांना व नागरिकांनी सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून दक्षता बाळगावी असे आवाहन उपविभागीय पाटबंधारे विभागीय चाळीसगाव येथील अधिकारी वर्गाने केले आहे. हे मनोहरी दृश्य बघण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.

गिरणा धरण शंभरी कडे वाटचाल करीत असून, पंधराव्यांदा व सलग दोन वर्षे शंभर टक्के धरण भरणार असल्याने शेती सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणारअसल्याने शेतकरीवर्ग आनंदीत, झाले आहे.

सद्यस्थितीत ९६.०५ टक्क्याच्यावर गेला असून धरणाच्या जलसाठ्यात येणाऱ्या आवक वाढत असून धरणाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने गिरणा धरणाचे तीन दरवाजे ३०सेमीने उघडण्यात येऊन वर उचलण्यात आले आहे .या तिन वक्र



दरवाजाद्वारे ३,६६३क्युसेस (१०३.६६ क्युमेक्स) पाण्याचा विसर्ग गिरणा धरणातून नदीपात्रात सोडण्यात आला आहे. यामुळे नदीपात्राला महापुराचे स्वरूप प्राप्त झाले आहेत. हे दृश्य बघण्यासाठी पर्यटकांची एकच झुंबड उडाली आहे.

नदीकाठच्या गावांतील गावकऱ्यांनी सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून दक्षता बाळगावी. असा सतर्कतेचा इशारा पाटबंधारे विभागाच्या चाळीसगाव कार्यालय तर्फे देण्यात आला आहे.

नांदगाव तालुक्यातील गिरणा धरणातून दिनांक ४ सप्टेंबर रोजी दुपारी एक दरवाजा ३०सेमीने वर उचलण्यात आला होता.त्यातून ८१४ क्युसेस विसर्ग सोडण्यात आला होता.

सद्यस्थितीत ९६.०५ जलसाठा उपलब्ध होता. परंतु गिरणा धरणात पाणलोट क्षेत्रातील पाऊस झाल्याने पाण्याची आवक सुरू होती. गिरणा धरणाच्या सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून पाण्याचा विसर्ग सोडणे आवश्यक होते. त्यानुसार ५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास वक्रदार क्रमांक १,२, व ६प्रत्येकी ३०सेमीने उघडण्यात येऊन गिरणा धरणातून नदीपात्रात ३६६३क्युसेस पाण्याचा विसर्ग सोडण्यात आल्याने नदीपात्राला महापुराचे स्वरूप प्राप्त झाले आहेत. हे दृश्य बघण्यासाठी पर्यटकांची एकच झुंबड उडाली आहे.

## आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार आता डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार नावाने दिला जाणार

### उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची घोषणा



**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई,दि. ५ : विद्यापीठ, महाविद्यालय, अभियांत्रिकी, चित्रकला या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत दिला जाणारा आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार यापुढे आता डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार या नावाने देण्यात येणार आहे. अशी घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

डॉ. जे. पी. नाईक यांच्या शैक्षणिक कार्याची दखल केंद्र शासनाबरोबरच देश विदेश आणि युनेस्कोने देखील घेतली आहे. त्यांच्या योगदानाबद्दलची कृतज्ञता म्हणून या पुरस्काराला डॉ. जे. पी. नाईक यांचे नाव देण्यात आले आहे. तसेच आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराकरिता शिक्षकांची होणारी निवड अधिक पारदर्शक आणि गुणवत्तापूर्वक खऱ्या अर्थाने समर्पित भावनेने शैक्षणिक क्षेत्रात अध्ययन, अध्यापन करून मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांची व्हावी याकरिता निवड प्रक्रियेच्या अटी, निकष कार्यपद्धतीत सुधारणा करून सुधारित शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कारार्थी

पुरस्कारासाठी अंतिम केंद्रीय छाननी समिती रचना

समिती सदस्य : अध्यक्ष- कुलगुरू, सदस्य- उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, कला संचालनालय सदस्य असतील तर दोन विषय तज्ञ सहसंचालक, उच्च शिक्षण (मुख्यालय) हे सदस्य सचिव असतील.

राज्यस्तरीय पुरस्कार निवड समिती

समितीचे अध्यक्ष - उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, उपाध्यक्ष - उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री, सदस्य अपर मुख्य सचिव,राज्यातील दोन मान्यवर शिक्षण तज्ञ,सदस्य-सचिव संचालक, उच्च शिक्षण हे असणार आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील बहिरेवाडी (ता. आजरा) येथे ५ सप्टेंबर १९०७ रोजी जन्मलेले प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक हे भारतीय शिक्षण क्षेत्राचे दीपस्तंभ मानले जातात. त्यांचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देश-विदेशात पोहोचले असून युनेस्कोनेही त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे. शिक्षण क्षेत्राला जीवन समर्पित करणाऱ्या या महान विभूतींच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार आता डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार या नावाने दिला जाणार आहे. या निर्णयातून शिक्षकांचा सन्मान अधिक अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी ठरेल, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

## कळवणच्या सरकारी शाळेत अन्नातून विषबाधा, ५१ विद्यार्थी आजारी, ४ जणांची प्रकृती गंभीर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कळवणच्या कनाशी येथील सरकारी कन्या आश्रम शाळेत विद्यार्थिनींना अन्नातून विषबाधा झाल्याने खळबळ उडाली आहे. ५१ विद्यार्थिनींना खाल्ल्यानंतर विषबाधा झाली, त्यापैकी ४ विद्यार्थिनींची प्रकृती बिघडल्याने त्यांना कनाशी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. उर्वरित ४७ विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर आहे. या घटनेची माहिती मिळताच आमदार नितीन पवार यांनी तात्काळ कनाशी प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले आणि विद्यार्थ्यांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना तातडीने योग्य उपचार देण्याच्या सूचना दिल्या. या घटनेमुळे संतप्त झालेले आमदार नितीन पवार म्हणाले की, दहिदुलेच्या मध्यवर्ती स्वयंपाकघरातून येणाऱ्या अन्नाबाबत यापूर्वीही तक्रारी येत होत्या. त्यांनी ही योजना आदिवासी विद्यार्थ्यांसाठी हानिकारक असल्याचे सांगत ती रद्द करण्याची मागणी केली. आमदार म्हणाले की ही योजना विद्यार्थ्यांना नाही तर कंत्राटदारांना फायदा देण्यासाठी आहे. ते म्हणाले की, प्रत्येक आश्रमशाळेत पूर्वीप्रमाणेच ताजे अन्न तयार केले पाहिजे. आमदार नितीन पवार यांच्यानंतर एक तासाने आलेल्या प्रकल्प अधिकारी अकुनुरी नरेश यांच्याबद्दल पालकांनी नाराजी व्यक्त केली. नरेश यांनी नंतर आश्रम शाळेला भेट दिली आणि मुख्याध्यापकांना दहिदुले येथून होणारा अन्न पुरवठा तात्काळ थांबवण्याचे आणि आश्रम शाळेतच नाश्ता आणि दुपारच्या जेवणाची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले. आरोग्य विभागाने अन्न आणि पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत, अहवाल आल्यानंतरच खरे कारण कळेल.

## परराज्यातील विदेशी मद्य वाहतूकप्रकरणी कारवाई

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. ५ : ठाणे जिल्ह्यातील खारेगांव - ठाणे रस्त्यावर गोवा राज्यातील मद्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर खारेगांव येथे ३ सप्टेंबर रोजी कारवाई करण्यात आली. या कारवाईत गोवा राज्यात निर्मित भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या १४०० बॉक्स दारूबंदी कायद्यातंर्गत जप्त करण्यात आले. टाटा कंपनीच्या डीडी ०१ ए ९०१७ क्रमांक असलेल्या चारचाकी टेम्पो वाहनासह एकूण १ कोटी ५६ लाख ६३ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच आरोपी मोहम्मद समशाद सलमानी (वाहनचालक) यास अटक करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, कोकण विभागाचे विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार, ठाणे अधीक्षक प्रवीण तांबे, उपअधीक्षक श्री. पोकळे, श्री. वैद्य, नवी मुंबईचे उपअधीक्षक ए. डी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई भरारी पथकाचे निरीक्षक एम. पी धनशेट्टी, दुय्यम निरीक्षक एन. आर. महाले, सहा. दुय्यम निरीक्षक बी. जी थोरात, तसेच जवान पी. एस नागरे, पी. ए महाजन, व्ही. के पाटील, श्रीमती एस.एस यादव, एम. जी शेख यांचा सहभाग होता. या गुन्ह्याचा पुढील तपास अधीक्षक प्रवीण तांबे, निरीक्षक श्री. धनशेट्टी करीत आहेत, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

## शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

नवी दिल्ली, ५ : शिक्षकांचे समाजातील स्थान सर्वोच्च असून शिक्षक मुलांमध्ये आत्मसन्मान आणि सुरक्षितता जागवतात. त्यांचे यश हेच शिक्षकांचे खरे बक्षीस आहे. राष्ट्रीय शिक्षा धोरण २०२० च्या अंमलबजावणीत शिक्षणाला आनंददायी बनवण्यावर भर देत बालिका शिक्षणाला प्राधान्य देण्यात येत आहे. भारताला कौशल्याची राजधानी आणि सुपर पॉवर बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यामध्ये शालेय शिक्षण क्षेत्रातील डॉ. शेख मोहम्मद वकिउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती), आणि कौशल्य विकास क्षेत्रातील श्री. अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागातर्फे आयोजित या सोहळ्यात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण आणि १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे (MSDE) सचिव देबाश्री मुखर्जी यावेळी उपस्थित होते. (पान ४ वर)

# माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर राजापूर विद्यालयात गणेश विसर्जन आणि सेवापुर्ती सत्कार सोहळा संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यामंदिर राजापूर विद्यालयात श्री गणेशाचे विसर्जन आणि गणित व विज्ञान विषयाचे तज्ञशिक्षक श्री कांगणे गंगाधर रामकृष्ण यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा संपन्न झाला.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक आणि विद्यालयाचे पालक संचालक श्री संपत भाऊ वाघ होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे माजी संचालक श्री. पोपटराव आव्हाड ,सत्कारमूर्ती श्री कांगणे जी.आर सर व सौ.कल्पना कांगणे मॅडम पूजेचे मानकरी श्री रामकृष्ण घुगे सर आणि सौ. रंजना घुगे मॅडम,माजी सरपंच आणि विद्यमान ग्रामपंचायत सदस्य श्री सुभाष भाऊ वाघ, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्राध्यापक ज्ञानेश्वर दराडे, माजी सरपंच श्री. प्रमोदआप्पा बोडके, भा.ज.पा चे युवा नेते दत्ताभाऊ सानप, ग्रामपंचायत सदस्य श्री धनरा-ज अलगट, येवला तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री लक्ष्मण भाऊ घुगे पत्रकार श्री अनिल भाऊ अलगट, माजी सरपंच दत्तू भाऊ वाघ, श्री बाळूभाऊ अलगट श्री बबनराव अलगट,माजी प्राचार्य श्री पी.के आव्हाड श्री सुभाष पांडुरंग वाघ श्री शंकर अलगट श्री. साखरचंद घुगे, श्री सोमनाथ अलगट, श्री अर्जुन वाघ, नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक श्री. नंदू भाऊ खरात, सामाजिक कार्यकर्ते बारकु भाऊ शिंगाडे, श्री. विजय धात्रक श्री. भाऊसाहेब विंचू श्री.दिलीप अलगट श्री. शंकर मगर उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे संचालक श्री. संपत भाऊ यांच्यातर्फे पूजेचे मानकरी श्री रामकृष्ण घुगे सर आणि सौ . रंजना घुगे मॅडम यांचा कपडे, पैठणी आणि बुके देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक श्री कांगणे गंगाधर रामकृष्ण यांच्या सेवापूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने संस्थेचे संचालक श्री संपत वाघ यांच्याकडून श्री. कांगणे सर आणि सौ. कांगणे मॅडम यांचा कपडे पैठणी आणि बुके देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी आणि सर्व मान्यवरांनी डीजेच्या तालावर ठेका धरत डान्स केला. विद्यालयात इतक्या मोठ्या स्वरूपात हा पहिलाच कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक आणि विद्यालयाचे पालक संचालक श्री संपत भाऊ वाघ यांनी एक क्विंटल चे बुंदीचे लाडू उपलब्ध करून दिले. संस्थेचे संचालक श्री रमेश भाऊ वाघ यांनी पण अन्नदानासाठी सहकार्य केले. त्याचप्रमाणे राजापूर आणि राजापूर पंचक्रोशीतील अनेक दानशूर व्यक्तींनी अन्नदानासाठी वस्तूच्या आणि पैशाच्या स्वरूपात मदत केली. पत्रा-वळी व द्रोण पाण्याचे जार गॅस टाकी तेल डब्बे अशा स्वरूपात मान्यवरांनी मदत केली. मदत करणाऱ्या दानशूर व्यक्ती मध्ये श्री. रामेश्वर चवंडगिर श्री बारकु भाऊ शिंगाडे,श्री. नंदू भाऊ खरात, श्री.नामदेव पवार,श्री वसंत धात्रक, श्री ज्ञानेश्वर दराडे श्री.दत्ता सानप श्री सुभाष वाघ सौ .लताबाई जाधव,श्री पी.के आव्हाड श्री प्रमोद आप्पा बोडखे श्री.साईनाथ वाघ, श्री सोमनाथ अलगट,डॉ.अविनाश विंचू श्री. ज्ञानेश्वर घुगे श्री लक्ष्मण भाऊ घुगे श्री अरुण भाऊ भोरकडे श्री. दादाभाऊ विंचु, श्री धनराज अलगट, योगेश बोराडे, श्री. समाधान चव्हाण श्री. बैरागी दाजी, श्री साहेबराव बोडके श्री. अनिल अलगट, श्री.अरुण भाऊ जाधव ,श्री. संपत नागरे, मंदा सोनवणे यांचा समावेश आहे. याप्रसंगी श्री लक्ष्मण भाऊ घुगे श्री प्रमोद अप्पा बोडके श्री दत्ता सानप श्री ज्ञानेश्वर दराडे पर्यवेक्षक श्री.आर बी. वाघ सर यांनी आपल्या मनोगतातून संचालक संपतराव वाघ यांच्या कार्याचे कौतुक केले एवढेच नव्हे तर संचालक संपतराव वाघ यांनी विद्यार्थ्यांसाठी भोजनासाठी वीस हजार रुपयाची देणगी दिली त्यांचा सर्वत्र कौतुक होत आहे त्याचप्रमाणे सेवानिवृत्त शिक्षक श्री. कांगणे जी.आर सर यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे प्राचार्य, पर्यवेक्षक , उच्च माध्यमिक विभाग प्रमुख, कला आणि सांस्कृतिक विभाग,सर्व शिक्षक , प्राध्यापक प्राध्यापिका व सर्व शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## ओकस्मिथ सादर करतो नागोमी: भारतीय व्हिस्की कारागिरीतील नवा मापदंड

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, ५ सप्टेंबर २०२५ : ओकस्मिथ, भारतातील आंतरराष्ट्रीय दर्जाची अग्रगण्य ब्लेंडेड व्हिस्की ब्रँड, आपली आजवरची सर्वात प्रीमियम आवृत्ती - ओकस्मिथ नागोमी - अभिमानाने सादर करत आहे. या लाँचद्वारे हा ब्रँड जपानी कौशल्य आणि जागतिक व्हिस्की बनविण्याच्या तज्ज्ञतेचा संगम घडवत, आधुनिक भारतीय व्हिस्कीला नवा मापदंड देत आहे.




या व्हिस्कीमध्ये स्कॉच माल्ट्सची समृद्धता, अमेरिकन बर्बनची मृदुता आणि जपानी ब्लेंडिंग तंत्राची अचूकता यांचा सुरेख मिलाफ घडवून समृद्ध, मृदु आणि संतुलित असा अनुभव साकारला आहे. 'नागोमी' या जपानी तत्त्वज्ञानाने प्रेरित - ज्याचा अर्थ सामंजस्य आणि संतुलन असा आहे - ही व्हिस्की विविध घटकांना एकत्र आणून परिपूर्ण सुसंगती साधण्याच्या कलेचे प्रतीक ठरते. ओकस्मिथएँ नागोमी ही व्हिस्की सनटोरीचे चीफ ब्लेंडर, शिंजी फुकुओयो यांनी तयार केली आहे. त्यांना नुकतेच इंटरनॅशनल स्पिरिट्स चॅलेंज २०२४ मध्ये मास्टर ब्लेंडर ऑफ द इयर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ओकस्मिथ नागोमी च्या माध्यमातून आम्ही केवळ एक नवी अभिव्यक्ती आणत नाही आहोत, तर भारतीय व्हिस्की विभाग उंचावण्याच्या आमच्या वचनबद्धतेची पुनरावृत्ती करत आहोत, असे ऋषी वल्ली, वरिष्ठ संचालक - मार्केटिंग आणि आयएमएफएल ब्रँड्स, सनटोरी ग्लोबल स्पिरिट्स यांनी सांगितले. जपानी 'सामंजस्य आणि संतुलन' या तत्त्वज्ञ-ानातून प्रेरित नागोमी ही अशी व्हिस्की आहे जी नव्या आकांक्षेची अभिव्यक्ती शोधणाऱ्यांसाठी तयार करण्यात आली आहे. ही आमच्या जागतिक उत्कृष्टता, परंपरा आणि प्रामाणिकतेच्या संगमाला वाहिलेली आमची निष्ठा देखील दर्शवते-ज्यामुळे उच्च-गुणवत्तेच्या, वेगळ्या आणि प्रीमियम अनुभव देणाऱ्या व्हिस्कीज तयार होतात, ज्यात खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय आत्मा आहे. हा लोकार्पण ओकस्मिथ ऍच्या प्रवासातील पुढचा अध्याय आहे, जिथे आमची जपानी परंपरा भारताच्या विकसित होत जाणाऱ्या स्वादांसाठी अधिक उंचावलेली निर्मिती घडवते,

ओकस्मिथ नागोमी ही भारतीय रसिकांच्या जिभेला साजेशी एक संवेदनशील अनुभूती आहे, जी अत्यंत बारकाईने तयार करण्यात आली आहे. तिच्या गडद सुवर्णरंगी झळाळत्या रूपापासून ते धुरकट, मसालेदार आणि फळांच्या सुगंधांपर्यंत ती एक परिपूर्ण अनुभव देते.

ओकच्या पिंपांमधून येणारे लाकडी स्वर तिच्या चवीत खुलतात आणि शेवटी हा अनुभव उजळ, मृदू आणि आश्चर्यकारकरीत्या दीर्घकाळ टिकतो. जपानी सौंदर्यशास्त्रातून प्रेरित झालेली बाटलीची रचना सामर्थ्य, साधेपणा आणि शाश्वत देखणेपणाचे प्रतिबिंब आहे, जी प्रामाणिकपणा आणि व्यक्तिमत्त्वाला महत्त्व देणाऱ्या आधुनिक भारतीय ग्राहकांच्या मनाला भावते.

## सटाणा शहरात ईद-ए-मिलाद उत्साहात साजरी





**दै. आवाज वृत्तसेवा..**

पिंपळदर (प्रतिनिधी) भगवान पवार - सटाणा शहरात शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली . दरवर्षी मुस्लिम धर्मीयांच्या उर्दू कॅलेंडरनुसार तिसरा महिना रबी उल अवल मध्ये हजरत मुहम्मद पैगंबर यांची जयंती साजरी करण्यात येते, या दिवशी मुस्लिम बांधव ईद ए मिलादुन्नबीची मिरवणूक काढतात. यावर्षी ५ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद म्हणजेच हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या जयंतीला एक हजार पाचशे वर्षे पूर्ण झाली, यामुळे मुस्लिम बांधवांमध्ये कमालीचा उत्स-ाह दिसून आला. सकाळी नऊ वाजता सटाणा शहरातून शोभायात्रा करण्यात आली शोभायात्रा संपल्यानंतर संपूर्ण मुस्लिम बांधव मज्जिद परिसरात एकत्र जमत एकत्रित एकमेकांना शुभेच्छा देत ईद-ए-मिलाद साजरी करण्यात आली.

सर्वत्र गणेश उत्सव सुरू असल्यामुळे पोलीस प्रशासनाने कायदा सुव्यवस्था अबाधित राखत कुठेही शोभायात्रेला गालबोट न लागू देता शोभायात्रा शांततेत पार पाडण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. यावेळी मुस्लिम पंच कमिटी तर्फे पोलीस उपविभागीय अधिकारी यशवंत बाविस्कर, सटाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक योगेश पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय राऊत, पोलीस उपनिरीक्षक अतुल बोरसे, तसेच गोपनिय चे सिकंदर कोळी, जितेंद्र बोरसे यांचा सत्कार करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. ईद-ए-मिलाद हा उत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वच आबाल वृद्ध तरुण मुस्लिम बांधवांनी परिश्रम घेतले.

## सुरगाणा तालुक्यात शिक्षक दिन उत्साहात साजरा विद्यार्थ्यांनी बजावली शिक्षकाची भूमिका

**दै. आवाज वृत्तसेवा..**

लक्ष्मण पवार, हतगड.. भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती सुरगाणा तालुक्यात विविध शाळांमध्ये शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली.जिल्हा परिषद शाळा सुरगाणा नं. १ मध्ये मुख्याध्यापक सुरेश जाधव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर आधारित विद्यार्थ्यांनी भाषणे केली.मुख्याध्यापकाची भूमिका आठव्या इयत्तेत शिकणारी देवयानी गवळी हिने बजावली. मोठ्या वर्गातील विद्यार्थी लहान मुलांना शिकविण्यासाठी उत्सुक होते. यावेळी वेगवेगळ्या शिक्षकांची लकब, नक्कल, कडक शिस्त या गुणांची नक्कल करण्याचा प्रयत्न विद्यार्थी करीत होते. पारंपरिक पेहराव साडी परिधान करून विद्यार्थी शिक्षक दिनात सहभागी झाले होते.




हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# विंचूर विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त गुरुजनांचा गौरवपूर्ण सन्मान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर (वार्ताहर): विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कला विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यालयातील शिक्षकांना त्यांच्या योगदानाबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी अनोख्या पद्धतीने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष जगदीश जेऊघाले यांनी भूषवले. शिक्षकांच्या सन्मानासाठी आयोजित या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत सदस्य, आणि विंचूर गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या सर्वांनी एकत्रितपणे सर्व शिक्षकांना फेटे बांधून आणि गुलाबपुष्प देऊन त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या वेळी शिक्षकांबद्दलचा आदर आणि प्रेम स्पष्टपणे दिसून आले. या कार्यक्रमात अनेक मान्यवर उपस्थित होते, ज्यात स्थानिक सल्लागार समितीचे उपाध्यक्ष कैलास सोनवणे, नानासाहेब जेऊघाले ,राजाभाऊ गोरे, सोमनाथ निकम, नानाभाऊ गाडे, दिनकर चव्हाण, जेऊघाले सर, जाधव ताई,राजाभाऊ दरेकर, पत्रकार दत्तात्रय दरेकर सुनील शिरसागर आणि इतर अनेक प्रमुख व्यक्तींचा समावेश होता. विद्यालयाच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिरसाठ, पर्यवेक्षक सुदामराव माळी, ज्युनिअर विभागाचे एच.ओ.डी. राजेंद्र टिळेकर, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या प्रसंगी पी. के. जेऊघाले यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व आणि शिक्षकांचे समाजातील योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी शिक्षकांचे आभार मानले. विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी सर्व उपस्थितांनी केलेल्या या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रयत शिक्षण संस्थेचे लाइफ मेंबर राजेंद्र चांदे यांनी केले. हा कार्यक्रम विंचूर विद्यालयाच्या इतिहासातील एक अविस्मरणीय सोहळा ठरला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात, दहावीच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण दिवसभर अध्ययन-अध्यापनाचा कार्यभार सांभाळला. या विद्यार्थ्यांपैकी श्रावणी गोराडेने मुख्याध्यापकाची, भाग्यश्री दरेकरने उपमुख्याध्यापकाची, आणि सिद्धी नेवगेने पर्यवेक्षकाची भूमिका यशस्वीपणे पार पाडली. अखेरीस, सर्व विद्यार्थ्यांनी मिळून विद्यालयातील शिक्षकांचा सन्मान केला.

## नायडोंगरी विद्यालयात भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी



**दै. आवाज वृत्तसेवा...**

नायडोंगरी ( वार्ताहर ) लोकनेते कै अँड विजय शिवराम आहेर हायस्कूल व जुनियर कॉलेज नायडोंगरी विद्यालयात भारतरत्न डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता सर्वप्रथम सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन उपमुख्याध्यापक श्री. टी. इ. मवाळ ,यांनी तर डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन पर्यवेक्षक श्री. पी. एन. सोनेज, संस्थेचे संस्थापक लोकनेते विजुमामा आहेर यांच्या प्रतिमेचे श्री महेश एरंडे सर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी मनोगत, तर ५ वी च्या मुलींनी समूहगीत सादर करून शिक्षक वर्गाला गीतातून शुभेच्छा दिल्या. विद्यालयातील शिक्षक श्री. एरंडे सर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. डी. एस. थोरात सर यांनी केले. या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या सौ पी व्ही आहेर यांनी सर्व शिक्षक वृंदाना आदर्श आचरण व विदयार्थी हित लक्षात घेऊन समृद्ध पिढी घडविण्याचे आवाहन केले सर्वांना शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या या वेळी उपस्थित संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षेकतरकर्मचारी, उपस्थित होते.अशा प्रकारे विद्यालयात भारतरत्न डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली.

## पिंपळगाव लेप येथे गंगाजल पुजन सोहळा संपन्न



**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे पिंपळगाव लेप : प्रतिनिधी येथील सात दांपत्य आठ दिवसापूर्वी काशी येथील काशी विश्वनाथ महादेवाच्या दर्शनासाठी गेले होते.या निमित्ताने पिंपळगाव लेप येथील महादेव मंदिरात सात दाम्पत्य श्री.दतु गायकवाड,श्री.भगवान ऊकाडे,ज्ञानेश्वर तांबे,श्री.भागवत दौंडे,श्री.सुनिल ढोकळे, श्री.प्रविण दौंडे,श्री.किरण कोल्हे आदींनी गंगा जलपूजन सोहळा थाटामाटात पार केला.सकाळी ९ वाजता गंगाजल पुजन ब्राह्मण गुरूच्या हस्ते केले.तर सकाळी १० वाजता काशी विश्वनाथ भगवान यांच्या गंगाजल पाण्याची भव्य मिरवणूक गावातून काढली होती.तर सकाळी ११ ते १ वाजेदरम्यान ह.भ.प ऋषिकेश महाराज कुयटे यांचे हरिकीर्तन झाले. तसेच आलेल्या असंख्य भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

दररोज वाचा दैनिक आवाज

## बुडवू नको शाळा नाही होणार भले,शिकूनिया बाळा लोक साहेब झाले..!

## सावरगाव विद्यालयात कवी सोनवणे यांची रंगली काव्य-गीत मैफिल,विद्यार्थ्यांना बालभोजनाचा उपक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : बुडवू नको शाळा नाही होणार भले शिकूनिया बाळा लोक साहेब झाले..! यासह विविध सामाजिक आणि शैक्षणिक संदेश देत कवि,गायक संतोष सोनवणे यांनी गायनाच्या मैफिलीतून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.आयुष्यात जिद्द आणि महत्त्वाकांक्षा ठेवली तर शून्यातूनही विश्व निर्माण करता येते.त्यासाठी शाळा,संस्कार आणि अभ्यास या त्रिसूत्रीला जीवनात कधीच विसरू नका असा मोलाचा संदेशही त्यांनी दिला. सावरगाव येथील न्यु इंग्लिश स्कुल माध्यमिक व एम.जी.पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात विविध उपक्रमांनी गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी आयोजित व्याख्यानपर कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डी.बी.नागरे, पर्यवेक्षिका सविता सौंदाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन उद्घाटन करण्यात आले. विद्यालयात गणपती बाप्पाला निरोप देण्यात आला तसेच विद्यार्थ्यासाठी बालभोजनाचा उपक्रम राबविण्यात आला. आपल्या व्याख्यानात श्री.सोनवणे यांनी कधी मंजूळ गायन तर कधी पहाडी आवाजाने प्रबोधनात्मक संदेश देताना विद्यार्थ्यांसह शिक्षकांना खिळवून ठेवले.मुघलांच्या ताकतीवर तलवारीचा वार आहे, शिवरायांच्या समशेरीला



अजूनही धार आहे...या पोवाड्यातून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये एकनिष्ठता आणि बानेदारपणाची शिकवण दिली.नाही करमत काय मी करू रे दादा काय मी करू ,झाला मोबाईल माझा गुरु रे दादा मोबाईल माझा गुरु..या विडंबनात्मक काव्यातून त्यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहण्याचा संदेश दिला. चला गड्यांनो गावाला जाऊया,आपला नाशिक जिल्हा पाहूया...या गीतातून त्यांनी क्षणार्धात जिल्ह्याची ओळख करून दिली.शाळा व शिक्षणची गरज,मनोरंजनातून शिक्षण,आई वडिलांचे महत्व,संस्कृती आदी विषयावर त्यांनी हसतखेळत मार्गदर्शन केले. सोबत काव्य गायन व गित गायनही श्री.सोनवणे यांनी केले. या कार्यक्रमाचा विद्यार्थी-शिक्षकांनी मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांना हसत खेळत शिक्षण घेऊन आयुष्यात उच्च ध्येय बाळगून प्रगती करावी हा संदेश श्री.सोनवणे यांनी दिला आहे.शाळा व शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानाचा खजिना खुला करतात,तो विद्यार्थ्यांनी लुटून स्वतःची प्रगती साधायला हवी असे यावेळी प्राचार्य श्री नागरे म्हणाले. यावेळी निलेश व्हनमाणे यांच्या हस्ते गणपतीची सपत्नीक पूजा करण्यात आली.विसर्जन व पूजेचे नियोजन जेष्ठ शिक्षक गजानन नागरे यांनी केले.गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. सांस्कृतिक विभाग प्रमुख वसंत विंचू व संतोष विंचू यांनी नियोजन केले. जेष्ठ शिक्षक गजानन नागरे, योगेश भालेराव, सुमेध कुऱ्हाडे, उमाकांत आहेर, कैलास मोरे, संजय बहिरम, योगेश पवार,रविंद्र दाभाडे, शिक्षिका अंजना पवार, सगुना काळे, भाग्यश्री माळी,रोहिणी भोरकडे, सुधीर मडके, मयुरेश पैठणकर, रोहित गरुड, निलेश व्हनमाने, मच्छीन्द्र बोडके, लक्ष्मण सांगळे, सागर मुंढे, आकाश नागपुरे आदीनी नियोजन केले.

***

## होरायझन अकॅडमीत शिक्षक दिन उत्साहात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मांडवड (प्रतिनिधी) - मराठा विद्या प्रसारक समाजाचे होरायझन अकॅडमी नांदगाव शाळेत आज रोजी शिक्षक दिन मोठे उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ञ डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी प्रार्थनेने झाली. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी शिक्षक यांनी शालेय कामकाज व अध्यापन कार्य केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत वर्गात अध्यापन कार्य केले जे पाहून शिक्षक आणि इतर विद्यार्थी भारावून गेले. यावेळी विद्यार्थी शिक्षकांनी गणित,विज्ञान मराठी, हिंदी,इंग्रजी,समाजशास्त्र, शारीरिक शिक्षण, कला,क्रीडा आदी विषय शिकविले.

यावेळी आयोजित कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षकांनी शिक्षकांचा यथोचित सन्मान केला या प्रसंगी शालेय मुख्याध्यापिका श्रीमती पूनम डी .मढे यांनी आपल्या भाषणात शिक्षकांच्या योगदानाचे महत्त्व सांगितले आणि विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक बनण्याचा सल्ला दिला.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सहावीचे विद्यार्थी शिक्षक काव्या वाळके,निर्विघ्न नाईक दोघांनी मिळून केले. तसेच आभार शौर्य आहेर यांनी मांडले. या कार्यक्रमाप्रसंगी शाळेचा परिसर आनंदाने गजबजून गेला होता हा दिवस शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये स्नेह व कृतज्ञेची भावना दृढ करणारा ठरला.

# मुरमी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक दिन साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी येवला तालुक्यातील मुरमी येथील जि.प.प्राथमिक शाळेत दरवर्षी शिक्षक दिन साजरा केला जातो.या अनुषंगाने आजच्या दिवशी विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.या शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका बजावण्याची जबाबदारी उचलली होती.शाळेची घंटा वाजली आणि प्रार्थनेपासून सुरुवात झाली रांगा करणे,पुढे लक्ष द्या असे सांगणे अशा सूचना सुरू झाल्या.ज्या विषयात जो पारंगत होता.त्याने तो विषय शिकवण्यास निवडला होता. शिक्षकांच्या भूमिकेतील विद्यार्थ्यांनी खेळ,कागदापासून विविध वस्तू बनवणे,गणित,भाषा,इंग्रजी,परिसर अभ्यास असे विविध विषय विद्यार्थ्यांना शिकवले.



शिक्षिका सोनाली आळंदीकर यांनी सुंदर फलक लेखन केले.दिवसाच्या शेवटी महान शैक्षणिक तत्ववेत्ते,भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला हार अर्पण केला.विद्यार्थ्यांनी शिकवताना आलेले अनुभव कथन केले,शिक्षकाच्या भूमिकेत असलेल्या शिक्षकांनी कसे शिकवले याचेही वर्णन विद्यार्थ्यांनी केले शेवटी सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुष्प देऊन कौतुक केले.विद्यार्थ्यांनीही शिक्षकांना फुले,ग्रीटिंग कार्ड देवून शुभेच्छा दिल्या. अशाप्रकारे जि.प.शाळा मुरमी येथे अतिशय उत्साहाने शिक्षक दिन साजरा करण्यात आला.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक चेतन पाटील,श्रीमती सोनाली आळंदीकर श्री.देसाई उपस्थित होते.

# तांदुळवाडी इंग्लिश स्कूलमध्ये 'शिक्षक दिन' मोठ्या उत्साहात संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शिक्षक दिनी मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे शालेय मंत्रिमंडळ.... शालेय संचालक म्हणून कुमार. श्रेयश दिनेश काळे तर मुख्याध्यापिका कुमारी. श्रुतिका सोनवणे आणि उपमुख्याध्यापिका कुमारी वैष्णवी आहेर. यांनी भूमिका स्वीकारली...




सकाळी सकाळी परिपाठ होऊन अतिशय उत्साहात पूर्ण वातावरणात चिमुकल्या शिक्षकांनी अध्यापन कार्य सुरु केले..... त्यानंतर मैदानात शिक्षक दिन विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला....कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे प्रतिमेस हार घालून करण्यात आली... चिमुकल्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचेसुरवातीचे सूत्रसंचालन शुभम चौधरी आणि प्राजक्ता चौधरी या दोघांनी केले. शिक्षक दिनाबद्दल लहानग्या मुला-मुलींनी भाषणे केली.भाषणाचे सूत्रसंचालन यश शिंदे व आराध्या देशमुख यांनी केले.शिक्षक दिनाचे महत्व सहशिक्षिका श्रीमती. पिलके मॅडम यांनी सांगितले. औचित्य साधून शिक्षक बनलेल्या विद्यार्थी वर्गाचा गुलाबपुष्प व पेन देऊन करण्यात आला. सत्काराचे सूत्रसंचालन हे ओम सोनवणे व समृद्धी काळे या दोघांनी केले. आमच्या चिमुकल्या विद्यार्थी यांनी सर्वांनी सुंदर असे सूत्रसंचालन केले. त्यानंतर शाळेच्या इतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका बजावली त्यात समृद्धी काळे प्रशांत काळे, शुभम चौधरी, साई काळे, स ओम सोनवणे प्राजक्ता चौधरी, इशिका काळे, ओम मस्के, श्लोक मस्के, ऋषिकेश पठाडे ऋषिकेश सोनवणे, श्रुतिका सोनवणे कनिष्का आहेर तेजस्विनी आहेर, हे रोशनी मुखर्जी, वेदांत आहेर, वैष्णवी काळे, स्वरा ढोकरे संस्कृती जाधव, भूमी आहेर, धनश्री ठाकरे, आदिनाथ काळे, त्याचप्रमाणे शाळेतील आँटी चे काम तेजल कवडे आणि कीर्ती जोरवर यांनी सुंदर प्रकारे सांभाळले. सर्व शिक्षकांनी आपापली भूमिका खूप छान प्रकारे केली. त्याचप्रमाणे मुख्याध्यपिका. सौ. नेहा काळे मॅडम यांनी चिमुकल्या शिक्षक यांना व सहकारी शिक्षक यांना शुभेच्छा दिल्या... तसेच गुलाब पुष्प व पेन देऊन गौरव केला.

हा कार्यक्रम उत्स्फूर्तपणे पार पडण्यासाठी स्कूल मॅनेजमेंट, व सर्व सहकारी शिक्षक तसेच विद्यार्थी यांनी मोलाचा सहभाग नोंदवला..

# शिक्षकांचे योगदान भारताला ...

(पान १ वरून) या पुरस्काराचा उद्देश शिक्षकांचे समर्पण, नाविन्यपूर्ण कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव करणे हा आहे. मागील काही वर्षांपासून या पुरस्काराची व्याप्ती वाढवून उच्च शिक्षण तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयातील शिक्षकांनाही संधी देण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील पुरस्कार विजेते शिक्षक

डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड)

सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई)

डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई)

प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती)

श्री. अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर)

या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रमाणपत्र, रौप्य पदक आणि ५० हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान केले.

## दिल्लीचे उपमुख्यमंत्री परवेश वर्मा यांनी घेतले महाराष्ट्र सदनातील 'श्री' चे दर्शन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नवी दिल्ली, ५ : महाराष्ट्र सदनात सुरू असलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज दिल्लीचे उपमुख्यमंत्री परवेश वर्मा यांनी सदनातील ' श्री' दर्शन घेतले. या वेळी निवासी आयुक्त आर. विमला यांनी त्यांचे स्वागत केले. स्वयंसहायता गटातील कारागिरांनी तयार केलेली पारंपरिक शॉल तसेच विविध हस्तनिर्मित उत्पादने त्यांना भेट म्हणून देण्यात आली. वर्मा यांनी हे उत्पादने पाहून समाधान व्यक्त केले आणि स्वयंसहायता गटाच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी उपमुख्यमंत्री वर्मा यांनी दिल्ली सरकारच्या पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, यमुना नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी दिल्ली सरकारने यंदा गणेश विसर्जनासाठी तब्बल ८५ कृत्रिम तलावांची निर्मिती केली आहे. या उपक्रमामुळे भाविकांना इको-फ्रेंडली विसर्जनाची सोय उपलब्ध झाली असून, नदीच्या संरक्षणास मोठी मदत होईल, असे श्री वर्मा म्हणाले.




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

✻ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून

**B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.**

प्रवेश पात्रता - १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




✻ वैशिष्टे ✻

✻ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
✻ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
✻ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
✻ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
✻ मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
✻ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
✻ मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९

पत्ता - कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799

श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया

(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) शैक्षणिक वर्ष २०२५-२६

**पदवी अभ्यासक्रम**

| | | |
|---|---|---|
| B.A.<br>(Bachelor of Arts Specialization)<br>B.A. Eniglish<br>B.A. Marathi<br>B.A. Hindi<br>B.A. History<br>B.A. Geography<br>B.A. Economice<br>B.A. Politics | B.Sc.<br>(Bachelor of Science Specialization)<br>B.Sc. Chemistry<br>B.Sc. Physics<br>B.Sc. Micro Biology<br>B.Sc. Botany<br>B.Sc. Zoology | B.Com.<br>(Bachlor of Commerce)<br>Business<br>Administration<br>Marketing |

**प्रवेशासाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असेल**

१) ॲडमिशन फॉर्म
२) मुळ कागदपत्र (Orignal L.C.) व दोन स्वयंसाक्षांकित प्रती
३) गुणपत्रकाच्या दोन स्वयंसाक्षांकित प्रती
४) जातीचा दाखला व दोन स्वंयसाक्षांकित प्रती (आवश्यक असल्यास)
५) आधार कार्ड दोन स्वयंसाक्षांकित प्रती
६) शिक्षणात खंड असेल तर गॅप सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा.

टिपः महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा. सदर कागदपत्र शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे.

✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻

✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799




**वाढदिवस शुभेच्छा, निवड/ नियुक्ती शुभेच्छा जाहिरात, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्घाटन सोहळा जाहिरात तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात**

✻ संपर्क ✻

९५४५९ १०१७७/८९९९९ २१९९४